**श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ,**
१, ना. ठा. मार्ग, न्यु मरिन लाईन्स्, चर्चगेट, मुंबई - २०.
**विशेष कक्ष**

जा.क्र. विशेष कक्ष/अ-३९/२०२४-२५/५४ दि. १६.०८.२०२४

<u>परिपत्रक</u>

प्रती,
मा. प्राचार्य/विभाग प्रमुख/प्रभारी/संचालक,
विद्यापीठ संचलित महाविद्यालये/विभाग/सेंटर/इंस्टिटयूट, चर्चगेट, जुहू, पुणे व श्रीवर्धन कॅम्पस्,
तसेच विद्यापीठ संलग्न महाविद्यालये/नोंदणीकृत संस्था, महाराष्ट्र राज्य,
श्रीमती ना. दा. ठा. महिला विद्यापीठ, मुंबई

विषय :- उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील 'गुणवतंत मुलामुलींना परदेशाात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' या योजनेंतर्गत सन २०२४-२५ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...

संदर्भ :- १) मा. शिक्षण संचालक, उच्च शिक्षण, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे पत्र क्र. उशिसं/शिष्य/परदेश शिष्य/२०२४/ दि. २३.०७.२०२४

२) मा. शिक्षण सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई यांचे पत्र क्र. ससं/उशि/मुंवि/परदेशी शिष्यवृत्ती/२०२४/५२९२, दि. २९.०७.२०२४

३) मा. संचालक, तंत्र शिक्षण, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांचे पत्र क्र. १८/तंशिसं/परदेशी शिष्यवृत्ती/२०२४-२५/२९४, दि. १६/०७/२०२४.

महोदय/महोदया,

विषयांकित संदर्भीय शासन पत्रं माहिती व पुढील योग्य त्या कार्यवाहीस्तव सोबत पाठविण्यात येत आहेत.

उपरोक्त संदर्भाधिन पत्रांन्वये, उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील 'गुणवंत मुलामुलींना परदेशाात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती' या योजनेंतर्गत सन २०२४-२५ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत अवगत करण्यात आले आहे.

या अनुषंगाने सूचित करण्यात येते की, सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीने आणि या योजनेला व्यापक प्रसिध्दी देण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही व्हावी.

कळावे.

आपला,

(डॉ. विलास नांदवडेकर)
कुलसचिव

प्रत : वरीलप्रमाणे

**महाराष्ट्र शासन**
**सहसंचालक, उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई**
**एलफिन्स्टन तंत्र शिक्षण विद्यालय आवार, महापालिका मार्ग, मुंबई - ४०० ००१**
Email : jdhemumbai@gmail.com
फोन व फॅक्स क्र. ०२२-२२६५६६००

जा.क्र. ससं/उशि/मुंवि/परदेशी शिष्यवृत्ती /२०२४/५२९२
दिनांक : २९/०७/२०२४

**ईमेलद्वारे/तात्काळ कार्यवाहीसाठी**

प्रति,

१. संचालक / प्राचार्य,
सर्व शासकीय व अशासकीय अनुदानित, विना अनुदानित,
कायम विनाअनुदानित महाविद्यालये, मुंबई विभाग.
२. कुलसचिव, मुंबई विद्यापीठ, फोर्ट, मुंबई - ४०० ०३२.
३. कुलसचिव, एस.एन.डी.टी.महिला विद्यापीठ,
चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.
४. कुलसचिव, महाराष्ट्र विधी विद्यापीठ, मुंबई.

**विषय : उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती " या योजनेंतर्गत सन २०२४-२५ करिता विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत...**

संदर्भ : क्र.उशिसं/शिष्य-/परदेशी शिष्य/दि.२३.०७.२०२४

उपरोक्त संदर्भांकित पत्राच्या अनुषंगाने आपणास कळविण्यात येत की, दि. ०४/१०/२०१८ च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष २०१८-१९ पासून राबविण्यात आली असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थामध्ये दिनांक ३१ जुलै २०२३ शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष २०२३-२४ पासून दिनांक ०४ ऑक्टोबर २०१८ च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या सर्व शाखांमधील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची संख्या १० वरुन ३० व डॉक्टरेट करिता १० विद्यार्थी अशा एकुण ४० विद्यार्थ्यांची शाखानिहाय विभागणी करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करिता ४० विद्यार्थ्यांना प्रतिवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

त्याअनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष २०२४-२५ करीता ऑनलाईन पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रिया तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://fs.maharastra.gov.in या संकेतस्थळावरुन सुरु करण्यात आलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत-

- उमेदवार व उमेदवाराचे आई/वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.
- शैक्षणिक वर्ष २०२४-२५ मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच प्रवेश घेण्यास इच्छूक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन २०२४ मधील) THE (Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) Ranking २०० च्या आत असणे बंधनकारक आहे. उमेदवारांच्या पालकांचे / कुंटुंबाचे व उमेदवार नोकरी करत असल्यास त्याचे स्वत:चे उत्पन्न धरुन सर्व मार्गानी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (सन २०२४-२५ मधील) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रुपये आठ लाखापेक्षा जास्त नसावे.

- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यपध्दती इत्यादी माहिती करीता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://foreignscholarship२०२२.dte.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यात आलेला शासन निर्णय, क्रमांक.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४, दि.०४ ऑक्टोबर, २०१८ व शासन निर्णय, क्र.संकीर्ण-२०२०/प्र.क्र.११६/तांशि-४, दि.०६/०९/२०२१ चा शासन निर्णय तसेच उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र.संकीर्ण-२०१८/प्र.क्र.२१८/तांशि-४दि.३०/१०/२०१८ व दि.११/०२/२०१९ ची शासन शुध्दीपत्रक पाहावीत व त्याअनुषंगाने अर्जाची छाननी करण्यात येईल.

सदर शिष्यवृत्ती योजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्याकरीता उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील "अ" दर्जाच्या वर्तमानपत्रातील सर्व आवर्त्यामध्ये जाहिरातही प्रसिध्द करण्यात येऊन, सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष २०२४-२५ साठी Online पध्दतीने अर्ज मागविण्यात आले आहेत.

इच्छुक, उमेदवारांनी https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online पध्दतीने अर्ज भरलेल्या अर्जाची प्रत, मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतीसह पडताळणीसाठी या कार्यालयात दि.१९ जुलै, २०२४ ते १२ ऑगस्ट, २०२४ (सायंकाळी ५ वाजेपर्यंत) सादर करावयाची आहेत.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी विनंती करण्यात येत आहे.

१. सर्व इलेक्ट्रॉनिक्स माध्यामांच्या वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी द्यावी.

२. आपल्या महाविद्यालयांच्या/विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट, ट्विटर अकाऊंटवरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.

३. कॅम्पस रेडिओ, महाविद्यालयांच्या /विद्यापीठाचे न्युज लेटर या दृकश्राव्य माध्यमांचा वापर करुन सदर योजनेची माहिती व जाहिरात यास प्रसिद्धी द्यावी.

४. आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या व्हाट्सअप ग्रुप तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या व्हाट्सअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यात याव्यात.

५. सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इंस्टाग्राम, यु-टयुब, इ. माध्यमांचा सुध्दा वापर करावा.

६. सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या महाविद्यालयाच्या व विद्यापीठाच्या आधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे उपरोक्त नमूद केल्याप्रमाणे सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यात यावी.

(डॉ. हरिभाऊ बं. शिंदे)
सहसंचालक
उच्च शिक्षण, मुंबई विभाग, मुंबई

# महाराष्ट्र शासन
## शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण)
## महाराष्ट्र राज्य मध्यवर्ती इमारत पुणे 01

web: www.dhepune.gov.in Mail: schol.dhepune@gov.in

फोन नं.020/26126939, 29707098 फॅक्स 020/26111153


क्र.उशिसं/शिष्य-/परदेश शिष्य/2024/ दि.

प्रति,
सर्व विभागीय सहसंचालक,
सर्व अकृषि महाविद्यालये

**विषय : उच्च व तंत्रशिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" या योजनेअंतर्गत सन 2024-25 करिता मागाविणेबाबत करावयाच्या कार्यवाहीबाबत..**

संदर्भ: 1) शासन निणर्य उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-2018/प्रक्र.218/तांशि-4, दि. 4 ऑक्टोबर,2018
2) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. संकीर्ण-2020/प्रक्र.116/तांशि-4, दि. 6 सप्टेंबर, 2021
3) शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. बैठक-2022/प्रक्र.188/तांशि-4, दि.31 जुलै 2023

महोदय,

उपरोक्त विषयाच्या अनुषंगाने आपणांस कळविण्यात येते की, संदर्भाधिन दिनांक 04 ऑक्टोबर,2018 च्या शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत खुल्या प्रवर्गातील "गुणवंत मुलामुलींना परदेशात उच्च शिक्षणासाठी शिष्यवृत्ती" योजना जाहीर करण्यात आलेली आहे. सदर योजना शैक्षणिक वर्ष 2018-19 पासून राबविण्यांत येत असून, या योजनेतंर्गत महाराष्ट्र राज्यातील खुल्या प्रवर्गातील जे गुणवंत विद्यार्थी पदव्युत्तर पदवी, पदव्युत्तर पदविका व पीएच.डी अभ्यासक्रमासाठी THE(Times Higher Education) किंवा QS (Quacquarelli Symonds) world Ranking 200 च्या आतील असलेल्या परदेशातील शैक्षणिक संस्थांमध्ये दि.31 जुलै, 2023 शासन निर्णयान्वये उच्च व तंत्र शिक्षण विभागांतर्गत शैक्षणिक वर्ष 2023-24 पासून दि.4 ऑक्टोबर 2018 च्या शासन निर्णयान्वये विहित केलेल्या सर्व शाखांमधील पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमाच्या विद्यार्थ्यांची संख्या 10 वरुन 30 व डॉक्टरेट करिता 10 विद्यार्थी अशा एकूण 40 विद्यार्थ्यांची शाखानिहाय विभागणी करण्यात आलेली आहे. त्या अनुषंगाने शैक्षणिक वर्ष 2024-25 करिता 40 विद्यार्थ्यांना प्रतीवर्षी परदेशात उच्च शिक्षण घेण्यासाठी शिष्यवृत्ती मंजूर करण्यात येते.

त्या अनुषंगाने सदर शिष्यवृत्तीसाठी शैक्षणिक वर्ष 2024-25 करीता Online पध्दतीने अर्ज मागविण्याची प्रक्रीया संचालनालयाच्या http://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावरुन सुरु करण्यांत आलेली आहे.

सदर शिष्यवृत्तीसाठी पात्रतेचे निकष खालीलप्रमाणे आहेत:
उमेदवार व उमेदवाराचे आई/वडील अथवा पालक भारताचे नागरिक तसेच महाराष्ट्र राज्याचे अधिवासी असावेत.

- शैक्षणिक वर्ष 2024-25 मध्ये प्रवेश घेतलेल्या तसेच प्रवेश घेण्यास इच्छुक असलेल्या उमेदवारांच्या परदेशातील शैक्षणिक संस्थेचे, अद्ययावत (सन 2024 मधील) THE (Times Higher Education) /किंवा QS (Quacquarelli Symonds) World Ranking 200 च्या आंत असणे बंधनकारक आहे.
- उमेदवाराच्या पालकांचे/कुटुबांचे व उमेदवार नोकरी करीत असल्यास त्याचे स्वतःचे उत्पन्न धरुन सर्व मार्गांनी मिळणारे मागील आर्थिक वर्षातील (2023-24) एकत्रित कौटुंबिक वार्षिक उत्पन्न रु.8 लाखापेक्षा जास्त नसावे.
- या योजनेच्या सविस्तर अटी व शर्ती, पात्रता, वयोमर्यादा, शैक्षणिक अर्हता, मिळणारे लाभ, शिष्यवृत्तीच्या लाभासाठी निवड कार्यवध्दती इत्यादी माहिती करिता तंत्र शिक्षण संचालनालयाच्या https://fs.maharashtra.gob.in या संकेतस्थळावर उपलब्ध करुन देण्यांत आलेला शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्रमांक संकीर्ण-2018/प्रक्र.218/तांशि-4, दिनांक 04 ऑक्टोबर, 2018 चा शासन निर्णय, दिनांक 31 जुलै 2023 चा शासन निर्णय उच्च व तंत्र शिक्षण विभाग क्र. बैठक-2022/प्रक्र.218/ तांशि-4, दिनांक 30 ऑक्टोबर, 2018 व दिनांक 11 फेब्रुवारी, 2019 ची शासन

सदर शिष्यवृत्तीयोजनेंतर्गत विद्यार्थ्यांकडून अर्ज मागविण्यात उच्च व तंत्र शिक्षण विभागाच्या वतीने महाराष्ट्रातील सर्व जिल्हयातील "अ" दर्जाच्या वर्तमानवपत्रातील सर्व आवृत्यांमध्ये जाहिरातही प्रसिध्द करण्यात येऊन, सदर योजनेंतर्गत पात्र उमेदवारांकडून शैक्षणिक वर्ष 2024-25 साठी Online पध्दतीने अर्ज मागविण्यांत आले आहेत.

इच्छुक उमेदवारांची https://fs.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर Online पध्दतीने अर्ज भरावयाचा असून सदर अर्ज भरण्यासाठी अंतिम मुदत दिनांक 09 ऑगस्ट, 2024 आहे. तसेच Online भरलेल्या अर्जाची प्रत, मुळ प्रमाणपत्रे / कागदपत्रे त्यांच्या साक्षांकित प्रतींसह पडताळणीसाठी संबंधित सहसंचालक, विभागीय कार्यालयात दिनांक 19 जुलै, 2024 ते 12 ऑगस्ट, 2024 (सायंकाळी 5 वाजेपर्यंत) सादर करावयाची आहेत.

सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या स्तरावरुन खालीलप्रमाणे कार्यवाही होण्यासाठी विनंती करण्यांत येत आहे.

1) सर्व इलेक्ट्रॉनिक माध्यमांचा वापर करुन या योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्यांत यावी.
2) आपल्या विद्यापीठाच्या अधिकृत वेबसाईट, ट्विटर अकाऊंटवरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करावी.
3) कॅम्पस रेडिओ, विद्यापीठाचे न्युज लेटर या दृकश्राव्या वापर करुन सदर योजनेची माहिती व जाहिरात यास प्रसिध्दी द्यावी.
4) आपल्या अधिनस्त असलेल्या सर्व महाविद्यालयांच्या प्राचार्यांच्या वॉटसअप ग्रुप तसेच माजी विद्यार्थी संघटनेच्या वॉटसअप ग्रुप वरुन सदर योजनेची माहिती व जाहिरात प्रसारित करण्याबाबत संबंधितांना आपल्या स्तरावरुन सूचना देण्यांत याव्यात.
5) सर्व समाजमाध्यमांकडून (Social Media) प्रचंड प्रमाणात वापरात येत असलेल्या फेसबुक, इन्स्टाग्राम, यु ट्युब,इ. माध्यमांचा सुध्दा वापर करावा.
6) सदर योजनेची माहिती विद्यार्थी व पालक यांच्यापर्यंत पोचविण्याच्या दृष्टीकोनातून आपल्या अधिपत्याखालील सर्व महाविद्यालयांना परिपत्रकाद्वारे उपरोक्त नमुद केल्याप्रमाणे सदर योजनेस व्यापक प्रसिध्दी देण्याबाबत अवगत करण्यांत यावे.

Signed by
Shailendra Kamlakar Deolankar
Date: 23-07-2024 11:19:40

**(डॉ. शैलेंद्र देवळाणकर)**
शिक्षण संचालक, उच्च शिक्षण
महाराष्ट्र राज्य, पुणे -1.